## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. १२ ( ) : कविता ही कधीच प्रतिक्रियात्मक नसते. आपल्या भोवतालच्या जाणीव -नेणीवेच्या अनुभवातून ती व्यक्त होत असते. शब्द सापडेपर्यंत धीर ठेवा आणि मग लिहीते व्हा असा सल्ला नवोदित कवयित्रींना सुप्रसिध्द कवयित्री नीरजा यांनी दिला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी आयोजित कवितालेखन मार्गदर्शन कार्यशाळेचे उद्‌घाटन करतांना नीरजा बोलत होत्या. प्र-कुलगुरु प्रा. पी.पी. माहुलीकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी व्य.प.सदस्य दिलीप पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

नीरजा म्हणाल्या की, पाठ्यपुस्तकापलिकडे जावून विद्यार्थ्यांनी अभ्यास केला पाहिजे. बऱ्याचदा सोप्या वाटा निवडल्या जातात. आपल्या जाणीव आणि नेणीवेतील अनुभव वेगवेगळे असतात. एकटे असतांना अनेक शब्द सुचतात. एखादी घटना घडल्यानंतर अनेकजण कविता लिहितात. मात्र प्रतिक्रियात्मक स्वरुपाची कविता कधीच नसते. त्या घटनेपुरती कविता मर्यादित असू शकत नाही ती सार्वत्रिक होईल आणि सगळ्यांचा तो अनुभव असेल अशा पध्दतीने कविता लिहिली गेली पाहिजे. आपले अनुभव कवेत घेण्याची क्षमता हवी. आपण सतत अस्वस्थ असायला हवे स्त्रियांना अजूनही वस्तूच्या स्वरूपात सादर केले जाते. संस्कृतीमधील विरोधाभास जाणून घेत लिखाण करा असे आवाहन करतांना नीरजा यांनी खूप वाचन करा वाचनाने समृध्द व्हा. ही शिदोरी तुम्हाला पुढे कामाला येईल असे सांगितले.

दिलीपदादा पाटील यांनी कविता ही भावभावनांचे योग्य शब्दात प्रकटीकरण करण्याचे माध्यम आहे असे सांगून ग्रामीण भागात अनेक सृजनशील लेखिका आहेत. त्यांना ह्या कार्यशाळेचा फायदा होईल असे नमूद केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. माहुलीकर यांनी साहित्यात स्त्रियांचे असलेले मागासलेपण भरुन काढण्याचा प्रयत्न होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करून शिक्षणामुळे स्त्रियांच्या जीवनात अमुलाग्र बदल होत असल्याचे सांगितले. विद्यापीठाला बहिणाबाईंचे नाव देवून साहित्याचा सन्मान केला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. प्रारंभी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. आशुतोष पाटील यांनी प्रास्ताविक केले. सविता पावरा व भावना संकोपाळ या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वरचित कवितांनी कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. मंचावर भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. म.सु. पगारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेत्रा उपाध्ये हिने केले.

उद्‌घाटनानंतर समकालीन स्त्रियांची कविता यावर डॉ. पी. विठ्ठल आणि कविता : वास्तवानुभव आणि काव्यानुभव यावर डॉ. रणधीर शिंदे यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात कमलाकर देसेले यांनी कविता रचना प्रकार विशद केला. प्रा. म.सु. पगारे यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला. या कार्यशाळेत पन्नास पेक्षा अधिक विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या कार्यशाळेसाठी सहकार्य केले.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१२ ( ) जातीव्यवस्था व स्त्रीमुक्ती या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून स्त्रियांच्या शोषणाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायम विरोध केला. आजच्या काळात बाबासाहेबांच्या याच विचारांची गरज आहे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या डॉ. प्रतिमा परदेशी यांनी व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने `डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रियांची उन्नती` या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत

बीजभाषण करतांना डॉ. परदेशी बोलत होत्या. यावेळी मंचावर प्र-कुलगुरु प्रा. पी.पी. माहुलीकर, उर्मिला पवार, प्रा. आशालता कांबळे, डॉ. रत्नमाला बेंद्रे, डॉ. अर्चना देगावकर, प्रा. विलास चव्हाण उपस्थित होते.

प्रतिमा परदेशी म्हणाल्या की, भारतात स्त्री अत्याचाराला देखील प्रथेचे नाव दिले गेले (मुरळी, सतीप्रथा, जरठ बालविवाह) या प्रथेविरूध्द बाबासाहेबांनी आवाज उठविला. स्त्रीया जाती व्यवस्थेच्या प्रवेशद्वार आहेत असे ते म्हणत. स्त्रियांवर बंधने लादून जातीव्यवस्था पुढे आली. बाबासाहेबांनी राजकीय परिषद भरवून स्त्री प्रश्नांवर चर्चा केली. हिंदू कोड बील मांडले मात्र जेव्हा या बीलाला पाठिंबा मिळत नाही हे लक्षात आले तेव्हा मंत्रीपदाचा राजीनामा दिला. स्त्रीयांच्या अधिकाराविषयी ते सातत्याने आग्रही राहिले. देशाच्य सध्याच्या परिस्थितीत बाबासाहेबांनी ज्या गोष्टींविरूध्द संघर्ष केला त्याच गोष्टी डोकेवर काढतांना दिसत आहेत. त्यामुळे सजगपणे या गोष्टीला विरोध करावा समाज हा स्त्री पुरुष समानतनेच चालेल असे त्या म्हणाल्या.

अध्यक्षीय समारोप प्रा. पी.पी. माहुलीकर यांनी करतांना तरुण पिढीने जागरुकपणे मतदान करावे असे आवाहन केले. स्त्री अभ्यास केंद्राच्या प्रभारी प्रमुख डॉ. रत्नमाला बेंद्रे यांनी प्रास्ताविक केले, दिपक सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. जगतराव धनगर यांनी आभार मानले. उद्‌घाटनानंतर डॉ. शोभा शिंदे यांनी शोषणावर उभ्या असलेल्या जातीव्यवस्थेवर प्रकाश टाकला. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. विलास चव्हाण होते. दुपारच्या सत्रात लेखिका उर्मिला पवार यांची भारत कडबे यांनी मुलाखत घेतली. त्यानंतर बाबासाहेब आंबेडकर आणि महिला यावर प्रा. आशालता कांबळे यांनी मार्गदर्शन केले. या परिषदेचे समन्वयक प्रा. प्रशांत सोनवणे व प्रा. विश्रांती मुंजेवार होते.

---

**बातमी क्र.३**

जळगाव दि.१२ (          ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवाला गुरुवार दि. १४ फेब्रुवारी पासून विद्यापीठाच्या प्रांगणात प्रारंभ होत आहे. या महोत्सवात सहाशे विद्यार्थी कलावंत सहभागी होणार आहेत.

गुरुवारी सायंकाळी चार वाजता या युवारंग महोत्सवाचे उद्‌घाटन वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. पी.पी. पाटील राहणार आहेत. गुरुवारी दु. २ वाजेपासून येणाऱ्या संघांची नोंदणी केली जाईल. उद्‌घाटनानंतर सायं. ७ वाजता संघव्यवस्थापकांची बैठक होणार आहे. यापूर्वी चाळीसगाव, जळगाव, कुसूंबा आणि तळोदा या चार ठिकाणी जिल्हास्तरीय युवक महोत्सव झाले. यातील विविध कला प्रकारातील प्रथम तीन विजेते विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवात सहभागी होणार आहेत. यामध्ये ३१० विद्यार्थिनी आणि २८६ विद्यार्थी यांचा समावेश आहे. याशिवाय साथसंगत करणारे कलावंत आणि संघव्यवस्थापक दोनशेपेक्षा अधिक आहेत.

विद्यापीठाच्या परिसरात सहा रंगमंच आहेत. या रंगामंचावर शुक्रवारी स. ८ वाजता स्पर्धांना प्रारंभ होईल. शुक्रवारी रात्री उशिरा सर्व स्पर्धा संपतील आणि शनिवार दि. १६ फेब्रुवारी रोजी स. १० वाजता पदवीप्रदान सभागृहात अभिनेता व दिग्दर्शक योगेश कुलकर्णी यांच्या हस्ते पारितोषिक दिले जातील. अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. पी.पी. पाटील राहतील.

शुक्रवारी दीक्षांत सभागृहात मिमिक्री, मुकनाट्य, विडंबन व समुह लोकनृत्य या स्पर्धा होतील. स्टेज क्र. २ म्हणजे सिनेट सभागृहात भारतीय लोकगीत, सुगम गायन (पाश्चिमात्य), सुगम गायन (भारतीय), समुहगीत (भारतीय) व भारतीय लोकसंगीत या स्पर्धा होणार आहेत. रंगमंच क्र. ३ अर्थात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम विद्यार्थी भवनात शास्त्रीय गायन, शास्त्रीय वादन (सूरवाद्य), समुह गीत (पाश्चिमात्य), शास्त्रीय नृत्य व शास्त्रीय वादन

(तालवाद्य) या स्पर्धा होतील. रंगमंच क्र. ४ म्हणजे सामाजिक शास्त्र प्रशाळा सभागृहात काव्यवाचन, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा होणार आहेत. रंगमंच क्र. ५ व ६ हे विद्यापीठाच्या ग्रंथालयात राहणार असून याठिकाणी रांगोळी, क्लेमॉडेलिंग, फोटोग्राफी, इन्स्टॉलेशन, मेहंदी, कोलाज, स्पॉटपेंटींग, व्यंगचित्र आणि चित्रकला या स्पर्धा होणार आहेत. अशी माहिती युवारंगचे कार्याध्यक्ष दिलीप पाटील, विद्यार्थी विकास संचालक प्रा. सत्यजित साळवे, समन्वयक प्रा. अजय पाटील यांनी दिली.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : १२ फेब्रुवारी, २०१९

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ. सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी